# दस्त दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीस सादर करणेसाठी किंवा कबुली जबाब देणेसाठी झालेला विलंब क्षमापित करणे

Delay Condone for presenting the Document or for Admission

प्रक्रीया (Process)

## अ- पक्षकारांकडून करावयाची प्रक्रीया-

1.ज्या पक्षकाराकडून असा विलंब झालेला आहे, त्याने विलंब माफ करणेचा अर्ज जिल्हा निबंधकांना यांचे नावे संबंधित दुय्यम निबंधक यांचेकडे देणे

2.त्या अर्जामध्ये विलंब होण्याचे कारण नमूद करुन, त्याचे पुरावादाखल कागदपत्रे जोडावीत.

3.अर्जावर रुपये 5/- इतक्या किमतीचा न्यायालयीन मुद्रांक लेबल लावणे

4.अर्जदाराने विलंबासाठी दंड भरण्याची तयारी दाखविणे आवश्यक आहे व दंडाची रक्कम जमा करणे

## ब- दुय्यम निबंधक कार्यालयाकडून करावयाची **प्रक्रीया-**

1.असा अर्ज प्राप्त झालेनंतर, त्यात नमूद कारणांची प्रथमदर्शनी खात्री करणे व विलंबासाठीचा दंड स्विकारुन,जिल्हा निबंधक यांचे मंजुरीचे आदेशाचे अधीन राहून, दस्त नोदंणीस सादर करुन घेणे किंवा कबुलीजबाब नोंदविणे.

2. तथापि दस्ताची नोदंणी तहकूब ठेवणे.

3.तदनंतर, सदर अर्ज सह जिल्हा निबंधक यांचेमार्फत जिल्हा निबंधक यांचेकडे पुढील आदेशाकरीता सादर करणे

4.जिल्हा निबंधकांनी, अशा अर्जात नमूद कारणाची पडताळणी/खातरजमा करुन उचित मंजुरी दिल्यांनतर मंजुरी आदेश प्राप्त झाल्यांनतर त्या दस्ताची नोदंणी पूर्ण करणे

यासंबधात अधिक माहीतीकरीता, सारथी < दस्त नोंदणी< दस्त नोंदणी प्रक्रीया<सादरीकरण किंवा<कबूलीजबाब पहावे.